**मळी/ मद्यार्क/ मद्य वाहतुकीसाठी ई-लॉक / डिजीटल लॉक बसविणेबाबत दुसरा टप्पा अंमलबजावणी.**

## महाराष्ट्र शासन
## गृह विभाग

**शासन निर्णय क्रमांक- डिवायएस-११२१/प्र.क्र.२०४/राउशु-२,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- ०५ मे, २०२६.

<u>**वाचा:-**</u>
१) शासन पत्र क्र. डिजीटी १०२४/प्र.क्र. १००/राउशु-१, दि. ०३.०१.२०२५
२) शासन निर्णय क्र. डिवायएस-११२१/प्र.क्र.२०४/राउशु-२, दि. ३०.०४.२०२५.
३) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई यांचे पत्र, क्र. डिवायएस ११२०२१/डिजीटल लॉक/चार, दि.१०.०३.२०२६ व दि.१३.०४.२०२६.

<u>**प्रस्तावना:-**</u>

राज्यात प्रथम टप्प्यामध्ये शुद्ध मद्यार्क वाहतुक व मद्य/बीअर निर्यात वाहतूकीसाठी शासन निर्णय, दिनांक ३०.०४.२०२५ अन्वये विहित केलेल्या तांत्रिक मानकांचे *(Specification)* ई-लॉक/डिजीटल लॉक प्रणाली बसविणे दिनांक ०१.०७.२०२५ पासून बंधनकारक करण्यात आले होते. पहिला टप्प्यामध्ये राज्यातील नमुना-आय अनुज्ञप्ती आसवनीमधून शुद्ध मद्यार्काची वाहतूक करणारी वाहने आणि पीएलएल व बीआरएल (बीअर) या अनुज्ञप्ती घटकांकडून मद्य/बिअर निर्यात करणारी वाहने यांच्या वाहतूकीसाठी ई-लॉक/डिजीटल लॉक प्रणालीची अंमलबजावणी व्यवस्थित सुरु असल्याने आता दुसरा टप्पा लागू करुन इतर घटकांना यामध्ये समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>**शासन निर्णय:-**</u>

**१.** ई-लॉक/डिजीटल लॉक प्रणालीच्या अंमलबजावणी अंतर्गत दुसरा टप्पा पुढील वाहतूकीसाठी बंधनकारक करण्यात येत आहे:-

१) राज्याबाहेरुन येणारी व महाराष्ट्रातून प्रवास करुन अन्य राज्यात जाणारी मळी /मद्यार्क /मद्य वाहतुकीची वाहने / टँकर (ज्या वाहनांमधून / टँकरमधून मळी /मद्यार्क /मद्याची वाहतुक होत असते व राज्याच्या सिमेवर *Through Transport Pass* दिला जातो अशा वाहनांना राज्यात प्रवेश करताना व बाहेर पडताना)

२) K-फॉर्म नोंदणी अंतर्गत परराज्यातून राज्यात मद्याची आयात करणारी वाहने.

३) L-फॉर्म नोंदणी अंतर्गत परदेशातून आयात केलेले मद्य कस्टम बॉण्ड मधून राज्यातील FL-1 / FLWL-1 पर्यंत वाहतूक करणारी वाहने.

४) आसवनी मधुन निर्गत होणाऱ्या विप्रकृत मद्यार्काची (इथेनॉल खेरीज) राज्याअंतर्गत व राज्याबाहेर अंतिम स्थळापर्यंत तसेच, परदेशात निर्यातीसाठी भारतातील बंदरापर्यंत वाहतुक करणारे टँकर / वाहने

५) परदेशातील मद्य / मद्यार्क अथवा तत्सम पदार्थ महाराष्ट्र राज्यातील बंदरात / पोर्ट येथे आयात करुन केंद्र शासनाच्या नियंत्रणातील बॉन्डेड वेअर हाउसमधून इतर राज्यात निर्यातीकरिता महाराष्ट्र राज्याच्या सीमेपर्यंतच्य वाहतूकीची वाहने.

६) इतर राज्यातील मद्य / मद्यार्क अथवा तत्सम पदार्थ महाराष्ट्र राज्यातील बंदर / पोर्ट येथून परदेशात निर्यात करण्यासाठी महाराष्ट्र राज्यात होणाऱ्या वाहतूकीची वाहने (महाराष्ट्र राज्याच्या सीमेपासून *Through Transport Pass* (TTP) अंतर्गत राज्यातील बंदर/पोर्टपर्यंत होणाऱ्या वाहतूकीची वाहने).

**२.** मद्यार्क/मद्य वाहतूकीसाठी संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयामधील परिशिष्टात नमुद तांत्रिक मानके *(Specification)* असलेल्या ई-लॉक/डिजीटल लॉक प्रणाली बसविणे आवश्यक राहील व अशी तांत्रिक मानके असलेल्या पुरवठादार कंपनीला उक्त शासन निर्णयात नमुद अटी/शर्ती बंधनकारक राहतील.

**३.** उपरोक्त वाहतूक पासद्वारे परराज्यातून मद्य / मळी / मद्यार्क घेऊन महाराष्ट्र राज्याच्या सीमेवर येणाऱ्या वाहनांच्या बाबतीत डिजीटल लॉक/ ई-लॉक प्रणालीचा वापर बंधनकारक करण्याच्या अनुषंगाने इतर राज्यातील अबकारी आयुक्तांना कळविण्यात यावे.

**४.** सदरच्या दुसऱ्या टप्प्यात परिच्छेद क्र. १ मध्ये नमुद बाबींच्या वाहतुकीसाठी बंधनकारक करण्यात येत असून सदर दुसऱ्या टप्प्याची अंमलबजावणी दिनांक ०१.०६.२०२६ पासून सर्व संबंधित घटकांना बंधनकारक करण्यात येत आहे.

**५.** महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ याखालील कलम २८, २९ तसेच त्याअंतर्गतचे नियम यामधील तरतुदींचे सर्व अनुज्ञप्तीधारकांना पालन करणे बंधनकारक आहे. सदर शासन निर्णय मुंबई शुद्ध मद्यार्क (बंधित वाहतूक) नियम, १९५१ नियम ५ (१), महाराष्ट्र विदेशी मद्य (आयात व निर्यात) नियम, १९६३ नियम २४, महाराष्ट्र भारतीय बनावटीचे विदेशी मद्य (बंधित वाहतूक व निर्यात) नियम १९६८ नियम ७ (२), महाराष्ट्र थेट वाहतूक नियम १९९७ चे नियम ३ मधील तरतुदींनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०२६०५०५१३०१२०५३२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAVINDRA DIGAMBARRAO AUTE

Digitally signed by RAVINDRA DIGAMBARRAO AUTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Home Department, 2.5.4.20=F05A6913F9DEE1F453C9A1C5A89D8C4897737BA8E4AC0EDF3F2C6E69E25F4108, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=CA98EFAC317508AB9B5820B47955BC1BABB173F20D25ABD816ED91A9B6B0F16C, cn=RAVINDRA DIGAMBARRAO AUTE
Date: 2026.05.05 13:02:12 +05'30'

**( रविंद्र औटे )**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उपमुख्यमंत्री (राउशु) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई .
५) सर्व जिल्हाधिकारी.
६) सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
७) सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क.
८) कक्ष अधिकारी, राउशु-३, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) राउशु-२ (संग्रहार्थ).